# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
## निविदा सूचना

१) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४. हे झेरॉक्स पेपर, कार्ट्रेज, सीडी आणि डीव्हीडी रायटर, वाहन भाडयाने घेणेसाठी एक वर्षाच्या दरकरारासाठी निविदा मागवित आहेत.

| आवश्यक बाबींचा तपशील | अदमासे नग (संख्या) | निविदा दस्तावेजांची किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | निविदा विक्री बंद करण्याचा दिनांक व वेळ | निविदा परिषदेला सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| म.प्रा.शि.प.,मुंबई कार्यालयीन उपयोगाकरिता वातानुकूलित व विना वातानुकूलित वाहने आवश्यकतेनुसार/गरजेनुसार भाडेतत्वावर घेण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी दर ठरवू इच्छितात. (मारुती इस्टिम, आयकॉन, टाटा इंडिगो, लान्सर, ११८ ए.एन.इ. मिनी बस इ.) | - | रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) | रु. ४०००/- (रुपये चार हजार फक्त) म.प्रा.शि.प. च्या नावे कोणत्याही राष्ट्रीयकृत/ शेडयुल बॅकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे | १८/०८/२००९ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत | १९/०८/२००९ दुपारी १.०० वाजेपर्यंत | १९/०८/२००९ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत |

२) इच्छुक पात्र निविदादार राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४. दूरध्वनी क्रमांक ०२२-३६३६३१४ / २३६७९२६७ फॅक्स ०२२-२३६३६३१५ यांच्या कार्यालयाकडून अधिक माहिती मिळवतील व निविदा दस्तावेजांची पहाणी करु शकतील.

३) इच्छुक पात्र निविदाकारांनी लेखी अर्ज करुन व उपरोलेखित ना परतावा शुल्क रोख किंवा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईच्या नावे मुंबईतील बँकेचा काढलेला धनाकर्ष जमा करुन निविदा दस्तावेजांचा पूर्ण संच मिळवावा. निविदेची विक्री वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सुरु होईल. निविदादार एक किंवा जास्त बाबींसाठी निविदा भरु शकतात.

४) वरील तक्त्यामध्ये नमूद केलेली इसारा रक्कम निविदा दस्तावेजासोबत सादर करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय / शेडयूल्ड बँकेच्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला मुंबई येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे इसारा रक्कम देण्यात यावी. राष्ट्रीय किंवा शेडयूल्ड बँकेव्यतिरिक्त अन्य बँकांचा धनाकर्ष स्विकारला जाणार नाही. इसारा रक्कमेशिवाय सादर केलेली निविदा स्विकारली / विचारात घेतली जाणार नाही. कोणत्याही निविदादाराला किंवा अन्य प्रवर्गाला इसारा रक्कम किंवा अन्य अटी व शर्ती मध्ये सवलत देण्यात येणार नाही. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सहकारी संस्था, लघुउद्योग व अशा अन्य प्रवर्गानांही अन्य निविदादारांप्रमाणे समजण्यात येईल.

५) निविदादार किंवा त्यांच्या उपस्थित असलेल्या प्रतिनिधी समोर ठरविलेल्या दिनांकाला व वेळी वरील पत्यावर निविदा उघडण्यात येतील.

६) निविदा स्विकारणे आणि उघडण्यासाठी ठरविलेल्या दिवशी खरेदीदाराच्या कार्यालयाला सुट्टी जाहिर केली तर अशा प्रसंगी लगतच्या कार्यालय चालू असलेल्या दिवशी त्याच वेळी व ठिकाणी निविदा दस्तावेज स्विकारण्यात व उघडण्यात येतील.

७) ही निविदा किंवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

**सही/-**
**राज्य प्रकल्प संचालक**
**मप्राशिप, मुंबई**